# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# ललित कला केंद्र (गुरुकुल)

*एम्.ए. पदव्युत्तरपूर्व वर्ष (नाट्य)*

## अभियोग्यता कल चाचणी

**शैक्षणिक वर्ष : २०२४-२०२५**




**ललित कला केंद्र (गुरुकुल)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७.

फोन - ०२०-२५६२१६०८

Email : lkk.sppu@gmail.com

Like us on facebook:https://www.facebook.com/Lalitkalakendra/

# ललित कला केंद्र (गुरूकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*एम्.ए. पदव्युत्तरपूर्व वर्ष (नाट्य)*

## अभियोग्यता कल चाचणी (शैक्षणिक वर्ष २०२४-२५)

### एम्.ए. पदव्यूत्तरपूर्व वर्ष (नाट्य) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या सूचना

१. **एम्.ए. पदव्युत्तरपूर्व वर्ष (नाट्य)** या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांचा या आगोदर किमान **६ (सहा)** नाटकांच्या निर्मितीत सहभाग असावा. (यात अभिनय, तसेच दिग्दर्शन, नाट्यलेखन, नेपथ्य, प्रकाशयोजना यांसारख्या पडद्यामागील जबाबदा-या यांचा समावेश होतो.) रंगमंचीय पूर्वानुभवाचा तक्ता सोबत जोडलेला आहे, तो भरुन CCEP वरील तुमच्या अकांऊट वर upload documents म्हणून जो पर्याय दिलेला आहे त्यात Mandatory Previous Experience Document या सदरात upload करावा. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यस्पर्धा इत्यादी यांच्यातील सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील कात्रणे (त्यात तुमचे नाव असल्यास) देखील upload करावेत.

२. प्रवेश घेण्यासाठी वयोमर्यादा कमाल **३० वर्षे** असेल.

३. ललित कला केंद्रातील नाट्य विभागाच्या अध्यापनाची वेळ **सकाळी ८.०० ते सायं. ८.००** अशी राहील. त्यात सकाळी ८.०० ते १०.०० या वेळात सराव प्रात्यक्षिके घेतली जातील; तर १०.०० ते ४.०० या वेळेत सैध्दांतिक विषयांचे अध्यापन होईल. सायंकाळी ४.०० ते ८.०० या वेळात तालमींचे आयोजन केले जाते. दोन्हींसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास तो विद्यार्थी प्रात्यक्षिक, सैध्दांतिक परिक्षेसाठी **अपात्र** ठरेल.

४. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असून ह्यात **सैध्दांतिक** विषय आणि लिखित स्वाध्याय यांचा समावेश आहे. ह्या अभ्यासक्रमाचे स्वरूप अभिनय कार्यशाळेसारखे नाही, विद्यापीठाच्या वसतीगृहात राहाणे सक्तीचे नसले (आणि ह्यात प्रवेश/जागा मिळण्याची हमीही विभाग घेऊ शकत नसला), तरी एखाद्या निवासी-अभ्यासक्रमाप्रमाणे इथं वेळापत्रक असेल.

५. विद्यार्थ्यांनी वर्षभरात करावयाच्या गृहपाठांची यादी, त्यांची गुणविभागणी तसेच गृहपाठ जमा करण्याच्या अंतिम तारखा यांचा तपशील सत्राच्या आरंभी कळविण्यात येईल. अंतिम तारखेच्या दिवशी किंवा त्यापूर्वी गृहपाठ कार्यलयात जमा करणे अनिवार्य राहिल. अंतिम तारखेनंतर **सात** दिवस उशीरापर्यंत स्वीकारले जातील. पण प्रत्येक दिवसाचा एक गुण **वजा** होईल. सात दिवसांनंतर

जमा केलेल्या गृहपाठाचे गुणांकन केले जाणार नाही. वर्षभरातील सर्व गृहपाठ पूर्ण केल्याशिवाय त्या विद्यार्थ्यांची **निकाल जाहिर केला जाणार नाही.**

६. एम्.ए. (नाट्य) च्या प्रात्यक्षिक परीक्षेंतर्गत सादर होणा-या अंतिम नाट्य-प्रयोगासाठी :

१. एम.ए. भाग १ च्या अंतर्गत/प्रात्यक्षिक गुणांनुसार, एम्.ए. भाग २ अंतिम सादरीकरणाचा प्राधान्य क्रम ठरविला जाईल.
२. नाट्य निर्मीतीसाठी एका नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका एकाच विद्यार्थ्यांला करता येणार नाही.
३. प्रत्येक विद्यार्थ्यांला, नाट्यनिर्मितीमध्ये, एकूण किमान **तीन** जबाबदा-या व किमान **दोन** निर्मितीमध्ये सहभाग असवा.

७. अभियोग्यता कल चाचणी - प्रात्यक्षिक परीक्षेकरीता :

१. सोबत जोडलेल्या उता-यांपैकी कुठल्याही **एका** उता-याचे सादरीकरण.
२. सोबत जोडलेल्या कोणत्याही **एका** कवितेचे वाचिक अभिनयासह पाठांतर म्हणून दाखविणे.
३. पूर्वी तुम्ही अभिनय केलेल्या कोणत्याही नाटकातील एखादा उतारा सादर करणे.
४. आपल्या आवडीचे एखादे मराठी गीत गुणगुणून दाखविणे.

**डॉ. प्रवीण भोळे**
प्राध्यापक व विभागप्रमुख

# ललित कला केंद्र

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.**

## एम्.ए. पदव्यूत्तरपूर्व वर्ष (नाट्य) प्रवेश परीक्षा

**गद्य व पद्य उतारे**

### पुरूष १

**दगडोबा:** आसं म्हनू नगा सायब, आसं म्हनू नगा. बरं का सायब, वस्तू तीच, काय? वस्तू तीच, पन पानारा तिच्याकडनं कंच्या नदरेनं पाहातो ह्यावर समदं आसतं. आता ज्याला आपुन घान म्हनूनशान फेकून गेतो, त्यो कावळ्याचा घास आसतू. म्हंजी ह्या दुनयेत समद्यानला योकच न्याव लावून भागत न्हाय. आता माजाच दाकला घ्या! म्या आपल्याला इचारतू, म्या कोन? म्या म्हंजी योक कंडम मानूस, समद्या दुनयेनं नालायकीचा शिक्का मारल्याला कंडम मानूस तो म्या. आता आपल्यासारक्या भारी मानसाची जगन्याची तऱ्हा, आन् माज्यासारक्या कंडम मानसाची जगन्याची तऱ्हा सारकीच आसल का? पानं काय आंब्यालाच असत्यात का? एरंडाला नसत्यात? पर पानासारकं पान, म्हून एरंडाच्या पानाचं तोरान कुनी दारात बांधल्यालं बघितलंय का? आता मला काय तुमावानी मोटं घर आसावं, चांगली चांगली कापडं घालावी, चांगलं जेवावं, चंगली इलायती घ्यावी... आसं वाटत नसंल? वाटतंय! पर मला आसं वाटतंय, आसं निस्तं म्हनलं तरी दुनिया म्हननार, हे दगड्या, भाड्या, लायकी हाय का तुजी? पर म्हनूनशान माजी हाव सुटती का? आता तुमी मोटी मानसं. पैशानं कसा भरल्याला तुमचा. तुमी करनार तुमालापरवडनाऱ्या नीतीचा इचार, आन् आमचं वागनं सरळ का वाकडं, हे बघनार तुमच्या नीतीचा वळंबा लावून. म्या कंडम मानूस है, हे माज्या तोंडानं सांगतू. त्ये सांगाया दुसरा कोन कशाला हवा? म्या कंडम मानूस है आन् कंडमच ऱ्हानार. पर अशा ह्या कंडम मानसानं, घाम गाळूनशान मिळवलेल्या अर्ध्या भाकरीचा चतकूर घालोनशान माज्या पोरीला लहानाची मोटी केली. आता ज्या पोरेसाटी घाम गाळला, तिला दुसऱ्याच्या हाती देताना, गळल्या घामाचा दाम मागीटला तर चुकलं का माजं? आपुनच ठरवा न् बोला! आता पण्णास रुपये म्हंजी म्या काय कुबेराची तिजोरी मागतुया कां आपुनच ठरवा आन् बोला.

*पु. ल. देशपांडे*

**- ती फुलराणी** (पृष्ठ ४१, ४२)

मौज प्रकाशन- चौथी आवृत्ती- २०००

## पुरूष २

**लिअर:** गर्जा, वादळांनो, थोबाड फाटेपर्यंत! करा आक्रोश! करा गर्जना!
हे जलस्तंभांनो आणि तुफानांनो, सोडा फुत्कार
आमचे मनोरे भिजून जाईपर्यंत, आमचे पवनकुक्कुट बुडेपावेतो!
विचारवेगाने संचार करणाऱ्या हे गंधकाग्नींनो,
ओकाच्या वृक्षांना दुभंगून टाकणाऱ्या वज्रांच्या अग्रदुतांनो,
माझे शुभ्र डोके काढा होरपळून. चराचर कापवणाऱ्या हे विद्युतगर्जने,
हा पृथ्वीचा सघन गोलाकार कर सपाट एकाच तडाख्यात!
टाक फोडून निसर्गाचे साचे, कर नष्ट एका दमात सगळे बीजद्रव्य
ज्यातून निपजते ही जात कृतघ्न माणसांची.
कर गडगडाट पोट भरेपर्यंत! ओक आग! ओत पाऊस!
पाऊस, वारा, वीज, आग ह्या माझ्या मुली नाहीत.
हे पंचमहाभूतांनो, मी तुमच्यावर नाही करीत निर्दयतेचा आरोप.
मी तुम्हाला नाही दिले माझे राज्य, नाही म्हटले माझी मुले,
तुम्ही माझे काहीही नाही लागत, म्हणून तुमच्या कराल कृपेचा
चालू दे वर्षाव. हा इथे मी उभा आहे, तुमचा गुलाम,
एक गरीब, अशक्त, असहाय आणि तिरस्कारलेला असा म्हातारा.
पण तरीही मी तुम्हाला आहे म्हणणार लाचार हस्तक.
त्या दोन नष्टकर्मी मुलींबरोबर या आपल्या स्वर्गीय सेनेची
मिळवणी करणारे, आणि तीही अशा इतक्या वृद्ध
आणि शुभ्र डोक्याच्या विरुद्ध. छे छे! फार भयंकर!

*मूळ लेखक- विल्यम शेक्सपिअर*
*मराठी अनुवाद- गो. वि. करंदीकर*
- **राजा लिअर** (पृष्ठ १३२, १३३)
पॉप्युलर प्रकाशन- तिसरी आवृत्ती- २००६

## पुरूष ३

**तुघलक:** एकोणीस. फार छान वय असतं हे. आशा मनात जपण्याचं वय. एखाद्या किंमती हिऱ्यासारखी दुनिया अशी मोठी ठेवावी वाटते. दौलताबादला आलो, हा किल्ला बांधला तेव्हा मी एकवीस वर्षाचा होतो. चिरा न् चिरा माझ्या देखरेखीखाली घातला गेला. तेव्हा म्हणालो होतो, या किल्ल्यासारखा मी इतिहास घडवीन- चिऱ्याचिऱ्याने. एका रात्री जुन्या किल्ल्याच्या तटावर असाच उभा होतो. जवळची मशाल पुन्हा पुन्हा आपल्या ज्वाळा उभारुन भोवतालच्या आकाशात आपली सोनेरी पिसं चौफेर उधळीत होती. पलीकडे अर्ध बांधलेलं महाद्वार उभं होतं, आपल्या कमानीच्या कोंदणात आभाळ सावरीत. अचानक काही घडलं- एखादा मंत्र टाकावा कोणा मांत्रिकानं, तसं. मशाल, महाद्वार, किल्ला, आभाळ- वितळून वाहू लागलं, माझ्या धमन्यांत रात्रीच्या काळोखात मिसळून. रक्तात लक्ष लक्ष तारका नुसत्या चमचमत होत्या आणि काळाच्या विराट पसाऱ्यातल्या एका अणूनं- त्यात थबकल्या क्षणानं- आपल्या साऱ्या खुणा, सारे सारे सवाल असे झुगारुन दिले होते आणि तो उभा होता समोर- नम्र, शांत, स्थिर. त्याक्षणी मी माती होतो, मी हिरवळ होतो, मी तरळता धूर होतो, मी आभाळ होतो. अचानक लांब लांबून एका पहारेदाराचा शब्द घुमला, होशियार! आणि त्यासरशी- ती अर्धी जळलेली मशाल, तो अर्धाच उभारलेला महादरवाजा, सारंच पहाता पहाता पूर्ववत झालं, विलग होऊन गेलं.

नाही जवान पोरा, तुझ्या जवान वयाचा आम्हाला हेवा वाटत नाही. माणसाला सोसावं लागतं. जगावं लागतं ते सारं अद्याप तुझ्या बाबतीत पुढेच आहे. आम्ही पाहा- तो अद्भूत क्षण, हातोहात निसटलेला क्षण, तेव्हापासून पुन्हा कुठे भेटेल म्हणून शोधत आलो- अद्याप शोधतोच आहोत. आणि वाट्याला काय आलं? गेल्या चार वर्षात काय दिसलं आम्हाला? रात्रींनी काय दिलं आम्हाला? आम्ही पाहिली फक्त निबिड जंगलं, ऐकले जंगली लांडग्यांचे चीत्कार आणि त्यांना गावठी कुत्र्यांची मिळणारी प्रत्युत्तरं. आणखी वीस वर्षांनी आमच्या एवढा होशील तू. आम्ही असू त्या तेथल्या झाडीत जमीन पांघरुन गाढ पहुडलेले. याद येईल तुला आमची? काय वाटतं तुला?

*मूळ लेखक- गिरीश कर्नाड*
*मराठी भाषांतर- विजय तेंडुलकर*
- **तुघलक** (पृष्ठ ५४, ५५)
पॉप्युलर प्रकाशन- दुसरी आवृत्ती- १९९९

## स्त्री १

**यशोधरा:** अशातच बाळ जन्माला आला.
तर हे म्हणाले,
‘माझ्या मार्गात ‘राहुल’ आला
माझ्या वाटेत ‘अडथळा’ निर्माण झाला.’
- पण हा अडथळा त्यांनी ओलांडला;
राहुलाने त्यांना नाही अडवलं.
एका रात्री ते निघून गेले...
सौम्य चांदवा
शंभरपदरी ढगांतून स्रवत होता,
थंडी रुपत होती काहीकाहीशी.
देहे जाणिवा उमलण्याचा हा काळ...
पण ह्याच वेळी
त्यांना तीव्रतेनं वेगळंच वाटत होतं...

मला कळल्यावर खूपच आक्रोश मांडला मी.
माझ्या मुठीतलं काहीतरी सांडल्याचा
तो कांगावा होता.
पण मग सावरलं स्वत:ला
विचारलं, ‘कां गेले? कुठे गेले?’
उत्तरे नीट मिळाली नाहीत;
पण
त्यांनी जे केलं त्यात स्वार्थ नव्हता;
कशापासून पळ नव्हता
त्यात एक तळमळ होती
एवढं मात्र नक्की कळत होतं.

आणि मग एकेक कानावर येत राहिलं
त्यांचा झगडा, तप, साक्षात्कार...
... बुद्धपण!

*राजीव नाईक*

– **जातक नाटक** (सततची नाटकं)

(पृष्ठ १२१, १२२)

मौज प्रकाशन- प्रथम आवृत्ती- २००५

## स्त्री २

**मीना:** (हरवल्यागत होऊन) तेहा इथे अशी घाण नव्हती. गवत, पालापाचोळा... निसर्गाची घाण होती. निसर्गाची घाण सुंदर असते... त्याचे न् माझे विचार एकच असायचे... कुठे असेल तो?... भेटेल?... (एका दगडावर बसून) पंचवीस वर्षांनी मी इथं आलेय. योगायोगाने. प्रेमाची गोष्ट आहे ही. बदली होऊन आलेय. (उठून बाजूला जाऊन) तो भेटेल?... (व्याकूळपणे) भेटेलही... प्रेमाच्या गोष्टीत वाट्टेल ते घडतं. (दगडावर बसून) मी माझ्या चेम्बरमध्ये बसलेली असेन. (अभिनय करत) तो येईल. (कावरीबावरी होऊन नकारार्थी मान हलवतात- उठतात) नाही. तो भेटला तर... मॅच्युरिटीनं वागायचं... (मोठा उच्छ्वास सोडतात) त्याचं लग्न झालं असेल? (कावऱ्याबावऱ्या होतात... स्तब्ध होतात) मॅच्युरिटीनं वागायचं. पक्कता हवी... (व्याकुळपणे) ह्या वयात. (दगडावर बसतात) त्याचं लग्न झालेलं असू दे. संसार छान असू दे त्याचा. मुलं असू दे... मुलगी मोठी असेल आता... मुलगाही... (एकदम स्तब्ध. चेहऱ्यावर भावभावनांचे कल्लोळ उमटून जातात. मग एकदम त्यांचे लक्ष कबरीसमोरच्या कागदाचा तुकडा- त्यावर दगड इकडे जाते. मीना चटकन् उठून तिकडे जातात, कागदाचा तुकडा घेतात. वाचतात.) 'म्हणजे काय?' (चेहऱ्यावर आठ्या पडून) 'म्हणजे काय?' (चिटोरा टाकून देतात. संधिप्रकाश जाऊ लागलाय. मीना जाऊ लागतात, क्षणभरात लगबगीने परततात, तो चिटोरा घेतात, वाचतात) 'म्हणजे काय?' (थोडी स्तब्धता) मी न्यायाधीश आहे. ह्या चिटोऱ्यावर लिहिलेल्याचा अर्थ मी लावला पाहिजे. (चिटोरा पर्समध्ये ठेऊन) उन्हाळे-पावसाळे-हिवाळे, सकाळ-दुपार-संध्याकाळ. एकूण आयुष्य जाऊनही, म्हणजे काय? हा प्रश्न उरतो.

*श्याम मनोहर*

- **प्रेमाची गोष्ट** (पृष्ठ ६, ७)

पॉप्युलर प्रकाशन- प्रथम आवृत्ती- १९९८

## स्त्री ३

**ज्योती:** तुम्ही बसा बोलत आणि विचार करीत शांतपणानं. मला वेळ नाही. शांतपणाही नाही. माझी लढाई लढायला मला परत जायचंय. रात्री दारुच्या नशेत अरुण माझ्यासमोर उभा राहतो. तेव्हा तुम्ही या पाहायला हिंमत असली तर. त्याच्या डोळ्यांत श्वापद असतं, ओठात असतं, चेहऱ्यावर असतं. गात्रागात्रात अरुण श्वापद असतो, श्वापदाची प्रवृत्ती त्याच्या बाजूला उभी नसते. सुरुवातीला मी खुळ्यासारखी प्रवृत्तींपासून वेगळा अरुण शोधू पाहायची, त्याचा ध्यास घ्यायची, त्याला बिलगू बघायची. अनुभवानं कळलं की असं काही नसतंच. श्वापदही अरुण असतो आणि प्रियकरही अरुण असतो. राक्षस अरुण असतो आणि कवीही अरुण असतो. आणि हे सर्व एकसंध, एक असतं. एकात एक असतं. इतकं एकात एक की कुठला राक्षस आणि कुठला प्रियकर हेही काही वेळा कळू नये. प्रेमाच्या भरात असता गलिच्छ शिवी मिळावी आणि मार खाता खाता हळव्या, उत्कट चुंबनांचा वर्षाव घडावा; भयानक विटंबनेनंतर थकून झोपावं अणि उठून कामाला लागताना ठणकणाऱ्या वेदनेनं ओथंबणाऱ्या अपुऱ्या कवीतेच्या चार सुंदर ओळी हाती याव्यात; या सुंदर ओळींच्या प्रेमात नव्यानं पडावं आणि कुठल्यातरी प्रामाणिक हितचिंतकाला कशी टोपी घालावी याच्या नीच, धूर्त योजनांनी कान भरावेत– हे सगळं एका माणसात, एका वेळी! कुठल्या पशुत्वाचा बीमोड करु अणि कुठलं देवत्व जागवू, सांगा मला! हा सगळा मिळून एक अरुण आहे. आणि आहे असाच मला त्याला पत्करायचा आहे. कारण मी त्याला अव्हेरु शकत नाही–

*विजय तेंडुलकर*

– **कन्यादान** (पृष्ठ ६१, ६२)

पॉप्युलर प्रकाशन– तिसरी आवृत्ती– १९९४

## कविता १

### स्फूर्ति

काठोकाठ भरु द्या पेला, फेस भराभर उसळू द्या!
प्राशन करिता रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदलू द्या!
अमुच्या भाळी कटकट लिहिली  सदैव वटवट करण्याची,
म्हणेल जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची?
जिव्हेची बंधने तर ढिली करा तीव्र या पेयाने,
यदुष्णतेने द्यावापृथ्वी द्रवुनि मिसळती वेगाने!
होउनिया मग दंग मनी
व्हावे ते आणा ध्यानी
गा मग सुचतिल ती गाणी
परिसुनि त्यांचे  शब्द रुढिचे दास झणी ते खवळू द्या!
काठोकाठ भरु द्या पेला, फेस भराभर उसळू द्या!

सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला,
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या अम्हाला!
औचित्याचा फोल विवेका! जा निघ, या दुरवस्थेने
अम्हां घेरिले म्हणुनी घेतो झिंगुनिया या पानाने!
क्लृप्तीची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊ,
उडुरत्ने या गरिब धरेला तेथुनि फेकुनिया देऊ!
अडवतील जर देव, तरी
झगडू त्यांच्याशी निकरी,
हार न खाऊ रतीभरी,
देवदानवा नरे निर्मिले हे मत लोका कवळू द्या
काठोकाठ भरु द्या पेला, फेस भराभर उसळू द्या!

पद्यपंक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथिनिया देउ कसे!
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलुमाचे या करु पहा तुकडे तुकडे!
'महादेव हरहर' समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येउनि घुमतो अमुच्या कर्णी, 'निजती ते ठारचि मरती!'
उठा! उठा! बांधा कमरा!

मारा किंवा लढत मरा!
सत्वाचा ‘उदयोऽस्तु’ करा!
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळू द्या!
काठोकाठ भरु द्या पेला, फेस भराभर उसळू द्या!

*केशवसुत*

– **समग्र केशवसुत** (पृष्ठ २३६)
संपादक– भ. श्री. पंडित
व्हीनस प्रकाशन, दुसरी आवृत्ती

## कविता २

### पुष्कळा

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळांतली पुष्कळ तू
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी.

बघताना किति डोळे पुष्कळ तुझे,
देताना पुष- पुष्कळ ओठ;
बाहू गळ्यात पुष्कळ पुष्कळ,
पुष्कळ ऊर.

पुष्कळाचं तूं, पुष्क- कळावंती,
पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी.

*पु. शि. रेगे*

\- *पु. शि. रेगे* **ह्यांच्या निवडक कविता** (पृष्ठ ३८)
संपादक- प्रकाश देशपांडे

## कविता ३

किती बडवले किती तुडवले
कोण कोण लाथाडले
छाताडले किती
काय चुरगाळलं कसं पिरगळलं
किती दिले आवळे
घेतले कोहळे
मिरवले सोहळे
कसे काढले कोथळे
आम्हाला सगळं माहित्याय
त्यावेळी (डावीकडून) कोण कोण होतं?
आमचे डोळे तयार आहेत
आमचे कान तयार आहेत
आम्हाला सगळ्याचा नीट वास येतो
करणाराने करत ऱ्हावे
बघणाराने बघत ऱ्हावे
वाचणाराने वाचत ऱ्हावे

ल्हिणाराने ल्हित ऱ्हावे
ल्हिता ल्हिता एक दिवस
ल्हिणाराचा कागद जावा
                पेन जावा
ल्हिणाराचे हात जावे
                डोळे जावे

*नितीन कुलकर्णी*

– **नव अनुष्टुभ** (पृष्ठ ४०)
अंक पाचवा/सहावा, सप्टेंबर-डिसेंबर २०१४